# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १६ / २०२५

नवीन वीज जोडणी न देण्याबाबत

वल्लभ साहेबराव तापकीर ........................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, राजगुरूनगर (महावितरण) ................ प्रतिवादी १

धनंजय सुदाम तापकीर ................................ प्रतिवादी २

दत्तात्रय भिकाजी तापकीर ................................ प्रतिवादी ३

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- वल्लभ साहेबराव तापकीर

प्रतिवादी १ तर्फे :- १) राजेंद्र एडके, कार्यकारी अभियंता, राजगुरूनगर
२) राजेंद्र गोरे, उपकार्यकारी अभियंता

प्रतिवादी २ तर्फे : धनंजय सुदाम तापकीर

प्रतिवादी ३ तर्फे : दत्तात्रय भिकाजी तापकीर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ३० मे २०२५

आदेश पारित दिनांक :- २८ जुलै २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, पुणे परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २७ मार्च २०२५ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"१. तक्रारदाराची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.*

*२. सामनेवाला यांना आदेश देण्यात येतो की, तक्रारदार यांना नवीन वीजपुरवठा ७ दिवसाच्या आत देण्यात यावा.*

*३. सामनेवाला यांना आदेश देण्यात येतो की, तक्रारदारास देय भरपाई दंडाची रक्कम नवीन कनेक्शन झाल्यानंतर ताबडतोब अदा करावी."*

प्रस्तावना :-

मयत बाळा अनाजी तापकीर यांची आंळदी येथे गट क्रं.११६/७/१ येथे ० हे. ८८ आर पैकी ०.२२ आर इतकी शेत जमीन होती. सदर शेत जमीन इमारत विकास करण्याचे त्यांच्या वारसदारांनी ठरविले. मयत बाळा अनाजी तापकीर यांचे वारसदार खालीलप्रमाणे होते. १) मयत बाबू बाळा तापकीर, २) मारुती बाळा तापकीर ३) मयत बबन बाळा तापकीर. या तिघांच्या वारसदारांनी त्याबाबतचा विकसन करारनामा दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी केला. त्याबाबतची विस्तृत माहिती खालीलप्रमाणे.

<u>लिहून देणार</u>

१) श्री. गुलाब बाबूराव तापकीर २) श्री. कुंडलिक बाबूराव तापकीर ३) श्री. सदाशिव बाबूराव तापकीर ४) श्री. महादेव रामचंद्र तापकीर ५) श्री. अनिल रामचंद्र तापकीर ६) श्री. भिकू बबन तापकीर ७) श्री. धनंजय सुदाम तापकीर ८) श्री. संजय सुदाम तापकीर ९) श्रीमती लक्ष्मीबाई सुदाम तापकीर १०) श्रीमती शशिकला साहेबराव तापकीर ११) श्री. वललभ साहेबराव तापकीर १२) श्रीमती अनिता साहेबराव तापकीर १३) सौ. स्मिता अजय डोंगरे १४) सौ. बेबी नामदेव बुट्टे १५) श्रीमती संगिता रामदास धुले.

<u>मान्यता देणार</u>

१) श्री. बाळकृष्ण भिकाजी तापकीर २) श्री. नंदकुमार भिकाजी तापकीर ३) श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर ४) श्री. कैलास भिकाजी तापकीर ५) श्री. पोपट गुलाब तापकीर ६) श्री. शांताराम गुलाब तापकीर ७) श्री कालीदास कुंडलिक तापकीर ८) श्री. रोहीदास कुंडलिक तापकीर.

<u>लिहून घेणार</u>

१) मे. दिशा कन्स्ट्रक्शन करीता भागिदार श्री. फारुक आयूब हकीम

म.वि.नि.आ.

सदरहू विकसन करारनामा दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी सहदुय्यम निबधंक हवेली १८ या ठिकाणी रितसर रु.४७२५००/- ची स्टँप ड्यूटी भरुन नोंदणी करण्यात आला. सदर करारनाम्यातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणेः

- सदर वर्णन केलेली मिळकत लिहून देणार (अपिलार्थी व इतर) हे लिहून घेणार (मे. दिशा कन्स्ट्रक्शन) यांस विकसीत करण्यासाठी विकास करारनाम्याने देण्याचे ठरविले असून सदर मिळकतीमध्ये बांधकामाच्या पन्नास टक्के व आम्हास पन्नास टक्के जागेमध्ये मालकी हक्क तत्वावर बांधकाम पश्चिम बाजूस देहूचे बाजूने बांधून देणार आहात या मुद्द्यावर विकसनास देण्याची तयारी दर्शविली.

- पुढील व मागील बाजूस जेवढे दुकाने तयार होतील त्यातील पन्नास टक्के प्रमाणे दोघांचा समान हक्क राहील.

सदर बांधकाम २०१३ मध्ये सुरू होऊन दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ रोजी पूर्ण होऊन "दिशा हिलमीस्ट" या नावाची इमारत उभी राहीली आहे. वल्लभ साहेबराव तापकीर (अपिलार्थी) व धनंजय सुदाम तापकीर (प्रतिवादी २) व भिकाजी तापकीर हे विकसन करारनामात नमुद केल्याप्रमाणे इतर वारसदाराप्रमाणे हे सुध्दा वारसदार आहेत.

२. अपिलार्थी (वल्लभ साहेबराव तापकीर) यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक ३० मे २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थीने नमुद केले की, अपिलार्थी व इतर यांनी आळंदी येथील जमीन (गट क्रं.११६/७/१) मे. दिशा कन्स्ट्रक्शन कंपनीला ५० टक्के परतावा बांधकाम प्रमाणे विकसनास दिली होती, ते बांधकाम २०१३ मध्ये सुरू होऊन दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ रोजी पूर्ण होऊन "दिशा हिलमीस्ट" या नावाची इमारत बांधून पुर्ण केली.

- त्यानंतर विकासकाने दिनांक २४ ऑगष्ट २०१६ रोजी सहहिस्सेदारांना सदनिकांचा ताबा घेण्याबाबत नोटीस पाठविली. परंतू प्रत्यक्षात ताबा देण्यात आला नाही. तदनंतर भिकोबा व धनंजय तापकीर (प्रतिवादी २) यांनी मे. दिशा कन्स्ट्रक्शन यांस सदनिकांचा ताबा मिळण्याबाबत दिनांक ९ जून २०१७ रोजी नोटीस पाठविली, त्यावर विकासकाने कोणतीही कार्यवाही केली नाही.

- तदनंतर मे.दिशा कन्स्ट्रक्शन कडून दिनांक १९ ऑगष्ट २०१७ रोजी सहहिस्सेदारांना सदनिकेचा ताबा घेण्याबाबत नोटीस मिळाली. परंतू, पश्चिमेकडील सदनिका या त्रयस्त व्यक्तींना परस्पर

विकल्या होत्या. त्याबाबतची कल्पना वारसदारांना नव्हती. तथापि, विकसन करारनाम्यानुसार सदर बाब चुकीची होती. धनंजय सुदाम तापकीर (प्रतिवादी २) व दत्तात्रय भिकाजी तापकीर (सहहिस्सेदार) यांनी खडकी येथील न्यायालयात विकासकाविरूध्द फसवणूकीचा दावा (क्रं.१००८/२०१९) दाखल केला.

- अपिलार्थी व इतर सहहिस्सेदार यांना अंधारात ठेऊन धनंजय सुदाम तापकीर (प्रतिवादी २) दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी ३) यांनी विकासकासोबत कोर्टात परस्पर तडजोड केली व त्याबदल्यात त्यांचा हिस्सा सोडून प्रत्येकी रु.७ लाख व एक दुकान मोबदला म्हणून घेतले. सदर बाब अपिलार्थी व इतर सहहिस्सेदार यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी दिनांक १७ जुलै २०२२ रोजी त्या दोघांविरूध्द दिघी पोलीस ठाण्यात तक्रार (क्रं.११६/७/१) दाखल केली. तसेच, खडकी कोर्टात दावाही (क्रं.एमए/३३/२०२४) दाखल केला. नंतर कोर्टाने अपिलार्थी व इतर सहहिस्सेदार यांचा जबाब नोंदवून धनंजय सुदाम तापकीर (प्रतिवादी २) दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी ३) यांच्याविरूध्द दिनांक ३ ऑगष्ट २०२४ रोजी फौजदारी खटला (क्रं.२८७/२०२४) दाखल केला. सदर खटला खडकी कोर्टात चालू आहे.

- सदर इमारतीमध्ये अपिलार्थी व इतर सहहिस्सेदार त्यांच्यात सामंजस्य करारानूसार मिळकतीचे वाटप झालेले नसतानाही श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी २) च दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी ३) यांनी दिनांक २० जुलै २०२२ रोजी महावितरण आळंदी कार्यालयात वीज जोडणीकरीता नवीन मीटरसाठीचा अर्ज करून इमारतीतील काही मिळकतीमध्ये वीज जोडणी घेऊन बेकायदेशीर रित्या अंदाजे २०२१ पासून राहत आहेत. या संदर्भातसुध्दा सदर इमारतीतील सदनिकांचे वाटप झालेले नसल्याने महावितरण आळंदी कार्यालयात सदर वीज जोडणीच्या पत्रान्वये दिले होते. असे असूनही त्यांना वीज पुरवठा (ग्राहक क्रं.१७६०१८२१८७५६) दिनांक १४ जुलै २०२१ रोजी दिला. मात्र याबाबतची तक्रार त्यावेळी मंचाकडे करण्यात आली नव्हती. (टिप्पणी सदरहू पत्र रेकॉर्डवर नाही)

- त्यानंतर प्रतिवादी क्र.३ (श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर) यांनी दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी मंचाकडे नवीन वीज जोडणी मिळण्याबाबत तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या आदेशाने तक्रार अंशतः मंजूर करताना श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर यांना ७ दिवसात वीज जोडणी देण्याचे व तक्रारदारास देय भरपाई दंडाची रक्कम नवीन कनेक्शन झाल्यानंतर ताबडतोब अदा करण्याचे निर्देश दिले. प्रतिवादी क्र.३ (श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर) यांनी मंचापुढे या मालमत्तेचा वाद सिव्हिल कोर्टात प्रलंबित असल्याची बाब लपवून ठेवली.

- अपिलार्थीने सादर केलेला केसचा संपूर्ण घटनाक्रम पुढीलप्रमाणे.

# घटनाक्रम तक्ता क्र.१

| दिनांक | घटना | कागदपत्राचा क्रमांक |
|---|---|---|
| २२ फेब्रुवारी २०१३ | विकसन करारनामा सर्व्हे नं.११६/७/१ २१ आर चोवीसवाडी दिशा कन्स्ट्रक्शन बरोबर | १५४६/ २०१३ |
| 3 नोव्हेंबर २०१५ | बांधकामाच्या पुर्णत्वाचा दाखला (भोगवटा प्रमाणपत्र) आळंदी नगरपालीकाकडून | |
| २२ फेब्रुवारी २०१६ | विकसन करारनामा प्रमाणे विकसन पुर्णत्वाचा कालावधी ३६ महिने पुर्ण | |
| २२ फेब्रुवारी २०१६ | दिशा कन्स्ट्रक्शनकडून विकसन कालावधी वाढविण्या संदर्भात पत्र | |
| २४ ऑगष्ट २०१६ | दिशा कन्स्ट्रक्शनकडून (ॲड. अनूप कटारीया तर्फे) ताबा घेण्यासंदर्भात नोटीस/पत्र | |
| ९ जून २०१७ | भिकोबा व धनंजय तापकीर कडून (ॲड. नितेश तेवसे तर्फे) ताबा ५०% देण्यासंदर्भात दिशा कन्स्ट्रक्शन यास नोटीस | |
| १९ ऑगष्ट २०१७ | दिशा कन्स्ट्रक्शनकडून (ॲड. भुषण धोका तर्फे) सदनिकांचा ताबा घेण्यासंदर्भात नोटीस | |
| १३ आक्टोबर २०१७ | भिकोबा व धनंजय तापकीर यांसकडून खडकी कोर्टात केस दाखल | CRI M.A. 402/2017 RCC |
| २८ मे २०१८ | CRI M.A. 402 / 2017 खडकी (आदेश) (u/s 406,420,506 r/w 34 Against Builder Disha Construction | |
| १२ जून २०१८ | CRI M.A. 402 / 2017 नुसार धनंजय व भिकोबा यांसकडून RCC केस दाखल (खडकी कोर्ट) | RCC 202 / 2018 |
| २८ जून २०१९ | बिल्डर दिशा कन्स्ट्रक्शनकडून भिकोबा व धनंजय तापकीर व स्टेट ऑफ महाराष्ट्र विरुध्द केस दाखल | CRI M.A. 173 / 2019 |
| २२ जुलै २०१९ | CRI M.A. 173 / 2019 फायनल ऑर्डर Application stand rejected | |
| १३ जानेवारी २०२० | मुंबई हायकोर्टात सेटलमेंट, भिकोबा व धनंजय तापकीर व दिशा कन्स्ट्रक्शन यांच्यात | CRI App. 1008 / 2019 Case is kept in Lok Adalat for disposal |
| ८ फेब्रुवारी २०२० | मुंबई हायकोर्टात दुकान व ७ लाख घेऊन सेटलमेंट केल्यानंतर RCC 202 / 2018 केस मागे घेतली Case is kept in Lok Adalat for disposal | |
| १७ फेब्रुवारी २०२२ | धनंजय व भिकोबा वारस फ्लेट चा ताबा अनधिकृतपणे घेत असल्याने दिघी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्ज केला. | |
| २३ नोव्हेंबर २०२३,<br>६ फेब्रुवारी २०२४,<br>१९ फेब्रुवारी २०२४,<br>२७ मे २०२४,<br>१० फेब्रुवारी २०२५ | M.S.E.B च्या विविध खात्यांना मीटर कनेक्शन न देण्याबाबत अर्ज | |
| १६ फेब्रुवारी २०२४ | वल्लभ तापकीर व बेबी नामदेव बुटे यांनी खडकी कोर्टात दिशा कन्स्ट्रक्शन, धनंजय तापकीर व भिकोबा तापकीर वारस (बाळकृष्ण, नंदकुमार, दत्तात्रय, कैलास) यांस विरुध्द केस दाखल | |
| २ ऑगष्ट २०२४ | CRI M.A. 33 / 2024 ची फायनल आदेश (u/s 406/420, r/w 34 of IPC) नुसार धनंजय, भिकोबा (वारस) व दिशा कन्स्ट्रक्शन विरुध्द समन्स बजाविण्यास सांगितले | |
| 3 ऑगष्ट २०२४ | CRI M.A. 33 / 2024 ची आदेश नंतर RCC केस दाखल (पुढील कार्यवाहीसाठी) | RCC 287 / 2024 |
| ४ सप्टेंबर २०२४ | खडकी कोर्टाकडून समन्स जारी | |

- अपिलार्थीने विनंती केली की, "दिशा हिलमीस्ट" इमारतीमध्ये मिळकतीचे अपिलार्थी व सहहिस्सेदार यांच्यात करारानूसार वाटप होईपर्यंत व कोर्टातील प्रलंबित केसचा निकाल लागेपर्यंत सदर जागी श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) व इतर अन्य कोणासही नवीन वीज जोडणी देण्यात येऊ नये.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या उत्तरातील व दिनांक ३० मे २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- दिनांक २० जुलै २०२२ रोजी श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी बी-१०१ दिशा हिलमिस्ट येथे नवीन वीज जोडणी करीता शाखा कार्यालय आळंदी शहर येथे अर्ज केला होता.
- सदर अर्जासोबत प्रतिवादी ३ ने आधार कार्ड, विकास करारनामा. प्रतिवादी क्रं.२ चे नाव व इतर सहहिस्सेदाराचे असलेला सुची क्रं.२ (दस्त क्र१५४६/२०१३), सातबारा (गट क्रं.११६/७/१), बी-१०१ मध्ये राहत असलेल्या सहहिस्सेदाराचे नाव असलेले प्रतिज्ञापत्र इत्यादी पेपर जोडले होते.
- महावितरणने दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी बी-१०१ दिशा हिलमिस्ट या फ्लॅटची स्थळ तपासणी केली असता **सदर जागी दत्तात्रय भिकाजी तापकीर कुटूंबासह राहत असल्याचे व तेथे महावितरणची कोणतीही वीज जोडणी नसल्याचे आढळून आले.**
- तदनंतर त्याबाबत उपकार्यकारी अभियंता यांनी दिनांक ३ एप्रिल २०२३ रोजीच्या पत्रान्वये नवीन वीज जोडणीबाबत कायदेशीर सल्लागार यांच्याकडून कायदेशीर सल्ला घेण्यात आला व त्यास कायदेशीर सल्लागाराने अधिक्षक अभियंता पूणे ग्रामीण मंडळ यांना उत्तरादाखल दिनांक १७ मार्च २०२३ च्या इमेलने दिलेल्या उत्तराचा मजकूर खालील प्रमाणेः

  *"With reference to above subject, Legal advisor has given a guideline as per ref no. 2 in this email, it is mentioned that, as per section 43(1) of Electricity Act 2003. Commercial Circular no. 274 dated 11.11.2016. Judgement of Calcutta High Court in case of Abhimanyu Mazumdar Vs Superintending Engineer & Anr. AIR 2011. The Licensee MSEDCL has to provide the new connection to the owner or occupier of the premises as per rules."*

- त्यानंतर श्री.वल्लभ साहेबराव तापकीर (अपिलार्थी) यांनी श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांना नवीन वीज देण्याबाबत हरकत घेतली. "दिशा हिलमीस्ट" या विकसीत केलेल्या इमारतीमध्ये २४ फ्लॅट व २ दुकाने यांचे सामुहिक त्यांचे कोणत्याही प्रकारचे वाटप झालेले नाही. या बाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. करारानूसार त्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारची वीज जोडणी देण्यात येऊ नये. कोर्टाचा निकाल लागेपर्यंत वा सर्व जमीन मालकांना फ्लॅट व दुकानाचा खरा

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

ताबा कायमस्वरूपी मिळत नाही तो पर्यंत नवीन मीटर वा वीज जोडणी देण्यात येऊ नये, असे अपिलार्थीने त्यांच्या तक्रारीत नमुद केले आहे.

- सदर जागेची स्थळ तपासणी तात्काळ केली असता **श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) हे सदरील फ्लॅट मध्ये राहत असल्याचे निदर्शनास आले.** तसेच, श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी दिनांक १९ जुलै २०२२ रोजी हमीपत्रात नमुद केले आहे की, सदर जागेत वीज मंडळाची कोणतीही थकबाकी नाही. काही तांत्रिक कारणाने तेथे कोणतीही थकबाकी आढळल्यास श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) सदर थकबाकी भरण्यास तयार आहेत, तसेच, ते स्वतः अधिकृत कब्जेदार आहेत.

- त्यानंतर श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी वीज जोडणी मिळाली नाही म्हणून दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या आदेशाने तक्रार अंशतः मंजूर करताना श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांना ७ दिवसात वीज जोडणी देण्याचे व तक्रारदारास देय भरपाई दंडाची रक्कम नवीन कनेक्शन झाल्यानंतर ताबडतोब अदा करण्याचे निर्देश दिले.

- अपिलार्थीनी श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांच्या वीज जोडणीबाबत हरकत घेतल्यामुळे, तसेच विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात प्रकरण दाखल केल्यामुळे श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांची वीज जोडणी प्रलंबित आहे. मा.मंचाच्या आदेशाची अमंलबजावणी त्वरीत करण्यात येईल. मा.विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालय या न्यायासनाने सदरच्या तक्रारीवर योग्य तो निर्णय द्यावा ही विनंती.

४. प्रतिवादी क्रं.२ धनंजय सुदाम तापकीर व प्रतिवादी क्रं.३ दत्तात्रय भिकाजी तापकीर यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक ३० मे २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे विकसकाने तापकीर कुटूंबीय सहहिस्सेदार त्यांच्या मालकीस येणाऱ्या **पश्चिम दिशेची मिळकत परस्पर त्रयस्त व्यक्तींना विकलेली आहे.** श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) व यांनी खडकी येथील न्यायालयात विकासकाविरूध्द फसवणूकीचा दावा (क्रं.१००८/२०१९) दाखल केला. सदर दाव्यात सहहिस्सेदारासह तडजोड होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई येथे विकासक व श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांच्यामध्ये बांधकामातील

त्रुटीकरीता काही रक्कम अदा केली व त्रुटी दुरूस्ती करून देण्याचे कबुल केले. श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी सदर तडजोड मान्य केली आहे, तसा जबाब त्यांनी मा. अतिरीक्त पोलीस आयुक्त खडकी यांच्याकडे लेखी स्वरूपात दिला आहे. तसेच, नोंदणीसाठी (रजिस्ट्रेशन) तयार केलेल्या मसुदयावर सुध्दा सहमतीदर्शक सह्या केल्या आहेत.

- श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) व यांनी नमुद केले की त्यांनी **तडजोडीप्रती घेतलेली रक्कम अपिलार्थी व इतर सहहिस्सेदारांना दिलेली नसल्याने किंवा ती अपेक्षेपेक्षा कमी असावी; म्हणून विकासकाकडून झालेलया फसवणूकीचा राग मनात धरून वीज जोडणी देऊ नये असा तक्रार अर्ज अपिलार्थी व इतर सहहिस्सेदारांनी महावितरणकडे दिलेला** आहे. सदर प्रकरण हे कायदेशीर गुंतागुंतीचे आहे, म्हणून महावितरणने कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घेऊनच पुढील कार्यवाही केली जाईल असे कळविले. मंडळाच्या कायदेशीर सल्ल्यागारांकडुन दिनांक ८ मे २०२३ रोजी आळंदी व राजगुरूनगर शाखेस कळविण्यात आल्याप्रमाणे उपअभियंता चाकण यांनी दिनांक ३० जानेवारी २०२४ च्या पत्रान्वये आळंदी शाखेस वीज जोडणी देण्याबाबतचे आदेश देण्यात आले होते. परंतू त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. याबाबत पाठपुरावा केला असता, कायदेशीर सल्लागार मंडळाकडून दिलेल्या अहवालात त्रुटी असल्याचे सांगण्यात आले. सदर बाब ही कायदेशीर मंडळाचा अपमान आहे. याबाबतही वारंवार पाठपुरावा केला असता कोणतेही कारण देण्यात आले नाही.

- श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या आदेशान्वये नवीन वीज जोडणी ७ दिवसांत देण्याचे निर्देश दिले. त्यानंतरही वीज जोडणी देण्यात आली नाही; इतकेच नाही तर पाठपुरावा करूनही कोणतीही माहिती देण्यात आली नाही वा कारवाई करण्यात आली नाही. दिनांक २७ मार्च २०२५ रोजी चाकण उपविभाग कार्यालयास पत्र लिहीले असता श्री. **वल्लभ तापकीर यांनी विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात तक्रार दाखल केली असल्याने वीज जोडणीचे काम लांबणीवर पडल्याचे कळविण्यात आले.**

- वीज जोडणी मागणी अर्ज दाखल केला होता त्यापासून ते कक्षाकडे तक्रार दाखल करेपर्यंत अपिलार्थी व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांच्यात कोणताही कायदेशीर दावा न्यायालयात दाखल वा प्रलंबित नव्हता.

- वीज ही मुलभूत गरज आहे, त्यापासून वंचित ठेवण्याचे काम महावितरणचे अधिकारी व कर्मचारी अपिलार्थीकडून अपेक्षीत लाभ घेऊन करत आहेत व महावितरणने हित बासनात गुंडाळून अपिलार्थीस सहकार्य करीत आहे; असे स्पष्ट दिसते, सदर बाबीकडे लक्ष वेधने गरजेचे आहे.

- सदर इमारतीत श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) राहत असून आळंदी शाखेने अपिलार्थीस नवीन वीज जोडणी नियमानुसार दिलेली आहे व त्याचा ग्राहक क्रं.१७६०१८२१८७५६ हा आहे. सदर बाब आळंदी शाखा अभियंता तसेच, अपिलार्थीस निदर्शनास आणून दिली नाही. श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) ही अपिलार्थींच्या कुटूंबातील व्यक्ती आहे, मालक असतानाही सुध्दा केवळ मुलभूत हक्कापासून डावलण्यात आलेले आहे हे प्रामुख्याने निदर्शनास आणून देत आहे.

- श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी क्र.२) व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी अपिलार्थींचे गाऱ्हाणे फेटाळण्यात यावे अशी मागणी केली.

५. प्रतिवादी क्र १ महावितरण यांना दिनांक २१ जुलै २०२५ रोजी फोटोसह स्थळ तपासणी अहवाल तात्काळ कळविण्याचे दुरध्वनीवरून कळविण्यात आले होते. दिनांक २५ जुलै २०२५ रोजी प्रतिवादी क्र १ महावितरणने सदरहू जागेतील वादग्रस्त फ्लॅट चा व्हिडीओ व फोटो पाठविले. **सदरहू फ्लॅट बी १०१ मध्ये कोणीही राहत नसल्याचे कळविले. तसेच श्री. धनंजय तापकीर (प्रतिवादी २) (ग्राहक क्रं.१७६०१८२१८७५६) यांचा सुध्दा वापर असल्याचे दिसून आले नाही.** सीपीएल ची पाहणी केली असता त्यावर ग्राहकाचा वापर असल्याचे दिसत नाही.

**विश्लेषण व निर्णय**

६. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. वरील प्रकरणाचा अभ्यास केला असता निदर्शनास येते की, मयत बाळा अनाजी तापकीर यांचे वारसदार यांनी आंळदी येथे गट क्रं.११६/७/१ येथे ० हे. ८८ आर पैकी ०.२२ आर इतकी शेत जमीनीवर लिहून देणार (अपिलार्थी व इतर हिस्सेदार) हे लिहून घेणार (मे. दिशा कन्स्ट्रक्शन) मेसर्स दिशा हिलमिस्ट विकासक यांच्याबरोबर विकसन करारनामा दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी करण्यात आला. सदर मिळकतीमध्ये बांधकामाच्या पन्नास टक्के भाग विकासकास व पन्नास टक्के भाग जागेचे अपिलार्थी व इतर हिस्सेदारांना यांना समसमान मालकी हक्क तत्वावर बांधून देण्याचे ठरविण्यात आले. सदर इमारतीचे बांधकाम २०१३ मध्ये सुरु होऊन दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ रोजी पुर्ण होऊन "दिशा हिलमीस्ट" या नावाची इमारत बांधून

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

पुर्ण केली. सदर इमारतीमधील सदनिकांचे अपिलार्थी व इतर हिस्सेदार यांच्यात करारानूसार अजूनपर्यंत वाटप झाले नाही.

७. दिनांक २० जुलै २०२२ रोजी श्री.दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी बी-१०१ दिशा हिलमिस्ट येथे नवीन वीज जोडणी करीता शाखा कार्यालय आळंदी शहर येथे अर्ज केला.

वीज ग्राहकास नवीन वीज जोडणीसाठी माननीय आयोगाने कायदेशीर तरतूदी आखून दिलेल्या आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालीटी) विनियम २०२१ (विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके आणि पॉवर क्वालीटी २०२१) मधील विनियम ५ खालील प्रमाणे

*"५ वीज पुरवठा/अतिरीक्त भार/सेवेचे स्थानांतरण/सेवेचा विस्तार/पुरवठा पुर्ववत करण्यासाठी अर्ज*

*५.१ ........*

*५.२ ........*

*५.४ अर्जदार वितरण परवानाधारकाकडे वीज पुरवठा किंवा विद्युत भारातील सुधारणा सेवेचे स्थानंतरण, सेवेच्या विस्तारासाठी किंवा पुरवठा पुर्ववत करण्यासाठी छापील प्रतीद्वारे (केवळ ग्रामीण क्षेत्रासाठी) किंवा वेब पोर्टल किंवा मोबाईल ॲपवरुन अर्ज करताना खालील माहिती/तपशील/दस्तावेज सादर करील-*

*(१) अर्जदाराचे नाव आणि ज्या जागेला विजेच्या पुरवठयासाठी अर्ज करण्यात येत आहे. त्या जागेचा अर्जदार मालक आहे किंवा नाही.*

*(२) त्या जागेला विजेच्या पुरवठयासाठी अर्ज करण्यात येत आहे त्या जागेचा पत्ता पिनकोडसह आणि देयक पाठवण्याचा पत्ता, अशा पुरवठयाच्या जागेपासून वेगळा पत्ता असेल तर;*

*(३) अर्जदार जागेचा मालक नसल्यास, जागेच्या मालकाचे नाव;*

*(४) वीज वापराचा उद्देश आणि अशा प्रत्येक वापरासाठी अर्जात मागितलेला विद्युत भार;*

*(५) नवीन जोडणी, सेवेचे स्थानांतरण, अतिरीक्त भार, सेवेचा विस्तार, नावात बदल किंवा पुरवठा पुर्ववत करणे (जेव्हा सहा महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी पुरवठा खंडीत करण्यात आलेला असेल), यापैकी कशासाठी अर्ज करण्यात आला आहे;*

*(६) जागेशी संबधीत वायरींगचे काम प्रमाणित करणाऱ्या परवानाप्राप्त विद्युत कंत्राटदाराचे नाव, पत्ता, परवाना क्रमांक, संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, आणी ई–मेल चा पत्ता (उपलब्ध असल्यास).*

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

..................

५.६ *नवीन पुरवठयासाठीच्या अर्जासाठी, वितरण परवानाधारक अर्जाच्या नमुन्यासह केवळ खालील दस्तावेज मागेलः*

*ए. अर्जदाराच्या ओळखीचा पुरावा / दस्तऐवजांचे प्राधिकारपत्र (संस्था किवा कंपनी असल्यास)*

*बी. मालकीचा / वहिवाटीचा पुरावा (जागा मालकीची किंवा भाडेपट्टीने असल्यास)*

..................

*परंतू असे की, वितरण परवानाधारक अर्जदाराला 'ई-केवायसी' चा पर्याय देखील देईल.*

*सर्व अन्य वैधानिक आवश्यक्तांसाठी अर्जदार अर्जात दिलेल्या माहितीच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र / हमीपत्र सादर करील की, अर्जात दिलेली माहिती खरी आहे. अर्जदाराने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या सर्व कायदयातील सर्व आवश्यकतांची पूर्तता केली आहे आणि अशा रितीने पूर्तता न करण्यामधून उदभवलेल्या कोणत्याही बाबींसंबंधात अर्जदार तो / ती स्वतः कायदेशीररित्या जबाबदार राहील आणि अशा अ-पुर्ततेमुळे कोणताही तोटा झाल्यास वितरण परवानाधारकाला नुकसान भरपाई देईल."*

८. अपिलार्थी व श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांचे सदर विषयाबाबत वरील घटनाक्रम तक्ता १ नुसार खटले प्रलबिंत आहेत. तथापि, अपिलार्थीने मंचाकडे सदर विषयाबाबतीतील प्रकरण इतर न्यायसनापुढे प्रलंबित असल्याची बाब उघड केलेली दिसत नाही.

सबब, मा. विद्युत लोकपाल यांच्या निर्णयासाठी खालील मुद्दा विचारार्थ तयार करण्यात आला.

मुद्दा - श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) हे बी १०१ दिशा हिलमिस्ट इमारतीत नवीन वीज जोडणी मिळण्यास पात्र आहेत का?

उत्तर - नाही.

कारणमिमांसा : दिनांक २० जुलै २०२२ रोजी श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांनी बी-१०१ दिशा हिलमिस्ट येथे नवीन वीज जोडणीसाठी शाखा कार्यालय आळंदी शहर येथे अर्ज केला. सदर अर्जासोबत प्रतिवादी क्रं. २ ने सादर केलेल्या आधार कार्ड सादर केले त्या आधारकार्डवर २९०२ देहूफाट, पाण्याच्या टाकी जवळ, मुक्काम पोस्ट देहू आळंदी, ता. हवेली, आळंदी असा पत्ता होता. सोबत सामाईक असलेले इतर कागदपत्रे जसे की, विकास कराररनामा, प्रतिज्ञापत्र, इतर सहहिस्सेदाराचे असलेला सुची क्रं.२ (दस्त क्र१५४६/२०१३), सातबारा (गट क्रं.११६/७/१) इत्यादी कागदपत्रे सादर केली.

प्रतिवादी १ ने त्या जागेचा स्थळ तपासणी अहवाल दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी केला असता, तेथे श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर राहत असल्याची नोंद केली. तथापि, वरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, बी १०१, दिशा हिलमिस्ट या सदनिकेचे दत्तात्रय भिकाजी तापकीर यांच्या नावे वाटप झाल्याचे कागदोपत्री कुठेही नोंद नाही.

सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता व प्रतिवादी क्रं. १ यांनी पाठविलेले फोटो व व्हिडीओ यांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्रं.३ दत्तात्रय तापकीर यांचे बी-१०१ या फ्लॅट मध्ये सलग वास्तव्य असल्याचे दिसत नाही. म्हणजे त्यांचे सदर फ्लॅट मध्ये 'सेटल पझेशन' असल्याचे कुठेही आढळत नाही, तसेच, घटनाक्रमाचा तक्ता बघता त्यांच्या आपापसात खटले प्रलंबित आहेत. सबब, श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) हे नवीन वीज जोडणी घेण्यास पात्र नाहीत.

९. असे निदर्शनास येते की, मंचाने सर्व बाबींचा उहापोह न करता केवळ महावितरणचे उत्तर वेळेत न आल्यामुळे, जो निर्णय घेतला, तो नियमास धरून नाही. सबब, मंचाचा आदेश रद्द करण्यात येत असून श्री. दत्तात्रय भिकाजी तापकीर (प्रतिवादी क्र.३) यांना **वीज जोडणी न देण्याबाबतचे अपिलार्थींचे अभिवेदन मंजूर करण्यात येत आहे.** तसेच तापकीर कुटूंबातील सहहिस्सेदारांनी एकत्रित बसून परस्पर संमजसपणे सु-संवादाने वा सोडत पध्दतीचा अवलंब करुन सदनिका वाटपाबाबत मार्ग काढावा असा सल्ला देण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एस. डुंबरे, सचिव
म.वि.नि.आ.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)